लोकमत

# संरक्षण सेवेमध्ये अधिकारी होण्याची महाराष्ट्रातील युवक व युवतींना सुवर्णसंधी

## Notification for admission to SPI

## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (मुले) छत्रपती संभाजीनगर आणि सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (मुली) नाशिक

१. संरक्षण सेवेमध्ये अधिकारी म्हणून महाराष्ट्रातील युवक व युवती जास्तीत जास्त संख्येने जावे, ह्यासाठी महाराष्ट्र शासनाने छत्रपती संभाजीनगर येथे मुलांसाठी सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची (एसपीआय) व नाशिक येथे मुलींसाठी सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची (जीएसपीआय) स्थापना केलेली आहे.

२. जून २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या (एसपीआय) येथील मुलांच्या ५० व्या तुकडीसाठी व (जीएसपीआय) येथील मुलींच्या ०४ थ्या तुकडीसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. **पात्रताः** (अ) अविवाहित (मुलगा / मुलगी). (ब) महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) तसेच कर्नाटक राज्यातील फक्त बिदर, बेळगावी अणि कारवार जिल्ह्याचे अधिवासी. (क) जन्मतारीख ०२ जानेवारी २००९ ते ०१ जानेवारी २०१२ च्या दरम्यान. (ड) २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत (दहावी) परीक्षेला बसणारा /बसणारी. (इ) जून-२०२६ मध्ये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी पात्र असावे.

४. **शारीरिक पात्रताः** सैन्यदलात अधिकारी बनण्यासाठी दिलेल्या सर्व निकषांसाठी पात्र असावे. UPSC ने NDA आणि INA साठी दिलेल्या सर्व शारीरिक निकषांस पात्र असावे. हे निकष UPSC तथा संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. काही प्रमुख निकष पुढीलप्रमाणेः उंची मुलांसाठी कमीत कमी १५७ सें.मी. मुलींसाठी कमीत कमी १५२ सें. मी. वजन ४३ कि.ग्रॅ. रातांधळेपणा किंवा रंगांधळेपणा नसावा. मुलांसाठी छाती न फुगवता ७४ सें.मी. फुगवून ७९ सें.मी. NDA / INA प्रवेशासाठी UPSC च्या अधिसूचनेनुसार डोळ्यांची क्षमता असावी.

५. **लेखी परीक्षा आणि मुलाखतः** पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा इंग्रजी माध्यमातून ०५ एप्रिल २०२६ रोजी विविध परीक्षा केंद्रांवर घेतली जाईल. परीक्षेमध्ये एकाच प्रश्नपत्रिकेत ६०० मार्कांचे बहुपर्यायी Multiple Choice Questions, ७५ प्रश्न गणिताचे आणि ७५ प्रश्न सामान्यज्ञान General Ability Test (GAT) असे एकूण १५० प्रश्न असतील. प्रत्येक योग्य उत्तराला (४) गुण व चुकीच्या उत्तरास (-१) गुण मिळतील. लेखी परीक्षा साधारणतः इयत्ता ८ वी ते १० वीच्या स्टेट बोर्ड व सी.बी.एस.ई. च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यशस्वी उमेदवारांना शारीरिक तपासणी आणि मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल.

६. मुलांसाठी ऑनलाइन अर्ज www.spiaurangabad.com या संकेतस्थळावर आणि मुलींसाठी ऑनलाइन अर्ज www.girlspinashik.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. परीक्षा शुल्क रुपये ४५०/- (परत न करता येण्याजोगे) ऑनलाइन फक्त क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड किंवा नेटबँकिंग इत्यादीद्वारे भरावे. डिमांड ड्राफ्ट किंवा चलानाद्वारे भरलेले परीक्षा शुल्क स्वीकारले जाणार नाही. प्रवेश अर्ज संस्थेच्या अटी व शर्तीनुसार भरलेला नसल्यास अर्ज नामंजूर होईल, तसेच प्रवेश परीक्षा शुल्क परत मिळणार नाही.

७. **प्रवेश अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीखः** २८ फेब्रुवारी २०२६ संध्याकाळी २३:५९ वाजेपर्यंत.

८. **हॉल तिकीटः-** दिनांक २३ मार्च २०२६ नंतर संस्थेच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेता येतील.

९. परीक्षा संबंधित सूचनांसाठी मुलांनी www.spiaurangabad.com व मुलींनी www.girlspinashik.com हे संकेतस्थळ वेळोवेळी तपासावे. इतर कोठेही ह्या बाबत सूचना दिल्या जाणार नाहीत.

स्वाक्षरीत
(मकरंद देशमुख)
कर्नल (निवृत्त)
संचालक

[DGIPR-2025-26/ क्र.5/C-4413]